पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ४

**सभावृत्तांत**

दिनांक - **१०/०७/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **१०/०७/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बारणे माया संतोष

२. मा.गायकवाड निर्मला मनोज

३. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसलेने उपस्थित सन्मा.सदस्य यांनी सदर सभा दिनांक २४/०७/२०१८ रोजी दुपारी २.४५ वाजेपर्यंत तहकूब करणेत येत असल्याचे जाहिर केले.

-----------

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ४

**सभावृत्तांत**

( दिनांक १०/०७/२०१८ ची तहकुब सभा )

दिनांक - **२४/०७/२०१८** वेळ - दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक १०/०७/२०१८ ची तहकुब सभा **मंगळवार** दिनांक **२४/०७/२०१८** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.भोईर सुरेश शिवाजी
३. मा.घोलप कमल अनिल
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
६. मा.उषा संजोग वाघेरे-पाटील
७. मा.सुलक्षणा राजू धर
८. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पुजारी, मा.मोरे, चव्हाण – कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

दिनांक २६/०६/२०१८ व ०२/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २४/०७/२०१८ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.कमल घोलप
संदर्भ: मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नगररचना/रहाटणी/८/२३०/२०१८, दि.०३/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्रं.टिपीएस - १८९३।१४१२।युडी- १३, दि. २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजुर विकास आराखड्यातील तसेच पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजुर विकास योजनेतील वगळलेल्या भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.टिपीएस- १८९३।१४१२।युडी- १३, दि. २८ डिसेंबर १९९९ अन्वये मंजुर झालेली आहे. सदर विकास आराखड्यातील काही क्षेत्र महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र. पीसीएन - १६९७।९३४।प्र.क्र.८९।नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यापैकी मौजे रहाटणी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजुर विकास योजनेतील स.नं. २८ पै, २९ पै, ३७ पै, ३८ पै. मधील १२.०० मी. रुंद रस्त्याचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. सदर रस्त्याची सुमारे ५८० मी. इतकी लांबी असून त्यापैकी स.नं. २८ पै, २९ पै. मधील २००.०० मी. लांबीचा रस्ता १२.०० मी. रुंदीनुसार विकसित झालेला आहे. उर्वरीत स.नं. ३७ पै. व ३८ पै. मधील रस्ता पुर्ण रुंदीचा विकसित झालेला नाही. या क्षेत्रात बांधकामे असून सदर रस्त्याच्या जागेचे भूसंपादन होणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावित रस्त्याखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नवीन भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(**सीमा दत्तात्रय चौगुले**)
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४६६/२०१८
दिनांक : २५/०७/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.